.. Kakada Arati ..

# ॥ काकड आरती ॥

काकड आरती परमात्मया श्रीरघुपती ।
जीवशिव ओवाळीन निजीं निजात्मज्योती ॥ धृ ॥

त्रिगुण काकडा द्वैतघृतं तिंबिला ।
उजळीतों आत्मज्योती तेणें प्रकाशला ॥ काकड ॥ १॥

काजळी तामस अवघें तेज डळमळ ।
अवनी आवर अवघा निग निज निश्चळ ॥ काकड ॥ २॥

उदय ना अस्त जेथें बोध प्रातःकाळीं ।
रामी रामदास सहजीं सहज ओंवाळी ॥ काकड ॥ ३॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 27, 1999